**स्थायी निदेश १२-२०२४**

**कामकाजातील उणीवा दूर करणे, आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि खर्चात काटकसर करण्यासाठी उपाय योजना बाबत मार्गदर्शन.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१४**
**क्र.नपप्रसं/स्थायी नि./१२/२०२४/काम.ऊ.दु./आ.स्थि.सु./ख.का.उ.यो./कक्ष-१२/680**
**दिनांक :- 1 FEB 2024**

**संदर्भ :-** १) क्र.नपसु ००/प्र.क्र.२४/२०००/१, दिनांक १३ ऑक्टोबर २०००
२) क्र.संकीर्ण १०-२०००/प्र.क्र.८८/००/८, दिनांक १९ ऑक्टोबर २०००
३) क्र.नप्रस/पदनि/१०२०/प्र.क्र.१६४/२०००/७, दिनांक ०६ नोव्हेंबर २०००
४) क्र. नपसं २००१/प्र.क्र.६/२००१/२, दिनांक २६ नोव्हेंबर २००१
५) क्र. नपसु/२००१/प्र.क्र.६/२००१/५ दिनांक १५ जानेवारी २००१
६) क्र. नपप्रस/शानि.अनु./२००६/प्र.क्र.७१९/३२ दिनांक १८ ऑगस्ट, २००६.
७) क्र.नपप्रसं/२००५/म.रा.न.प.क.संघ/प्रलंबितमागण्या/प्र.क्र.२३६/२५दिनांक२०एप्रिल, २००६.

**प्रस्तावना :-**

नगरपरिषदांकडून त्यांचेवर कायद्याने सोपविलेल्या विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ व त्याअन्वये अस्तित्वात असलेले नियम, उपविधी तसेच नगरपरिषदेच्या कामकाजाशी संबंधित अन्य अधिनियम यातील तरतुदीअन्वये पूर्ण जबाबदारीने पार पाडल्या जात नाहीत. त्यामुळे खालील नमुद केल्याप्रमाणे अनेक उणीवा दिसून आल्या आहेत. तसेच राज्यातील बहुतेक नगरपरिषदांची सध्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे.

१) नगरपरिषदेच्या कारभाराचे वार्षिक तपासणीचे माध्यमातून आर्थिकदृष्ट्या अचूक विश्लेषण न होणे नगरपरिषदांच्या कारभारात आढळून आलेल्या अनियमिततांवर प्रभावी नियंत्रण आणण्यात अपयश.

२) नगरपरिषदांचे तपासणी टिपणीचे वाचन वेळीच न होणे, त्यामुळे तपासणीत काढण्यात आलेल्या मुद्यांचे गांभीर्य न राहता नगरपरिषदांकडून पूर्तता अहवाल सादर न होणे.

३) नगरपरिषदांचे कामकाजाचे विभागीय पातळीवरून घेण्यात येत असलेल्या सभांमध्ये उचित मुल्यमापन होवून नगरपरिषदांच्या कामकाजाचा अचूक आढावा घेता यावा व कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवता यावे याकरीता अशा सभासाठी ठराविक प्रपत्रे विहित करण्यात आलेली नसणे.

४) न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या तक्रार अर्जावर प्रतिवादी नगरपरिषदा यांचेतर्फे लेखी अभिकथन विहित मुदतीत न्यायालयात सादर न होणे, त्याचप्रमाणे लेखी कथनाच्या पृष्ठर्थ तक्रारदाराच्या तक्रारीचे खंडन करण्यासाठी प्रतिवादी नगरपरिषद यांचे मार्फत कागदपत्र सादर करण्यात न येणे त्यामुळे न्यायालयाचे निकाल नगरपरिषदेविरूध्द लागणे, मुदतीत अपील न करणे, न्यायालयीन कामकाजाबाबत मुख्याधिकाऱ्यांकडून आवश्यक दक्षता न घेतली जाणे.

५) नगरपरिषदा अंदाजपत्रके तयार करतांना जमा व खर्चाच्या रकमा वाढवून दाखविणे, प्रलंबित असलेल्या दायित्वात वाढ करणे, मालमत्ता कर व पाणीपट्टी यात गरज असताना दरवाढ न करणे, नगरपरिषदामध्ये विविध निधीचे योग्य विनियोग न होणे. वित्तीय शिस्तीचे पालन न करणे नगरपरिषदांची आर्थीक स्थिती सुधारण्याकरीता महत्वाच्या उपाययोजनांची गरज.

६) राज्यातील नगरपरिषदांचे आर्थिक स्थितीचा आढावा घेता मत्तेपेक्षा दायित्व वाढत चाललेले आहे. आर्थिक शिस्तीचे सातत्याने काटेकोर पालन न होणे, त्यामुळे नगरपरिषदांचे खर्चात काटकसर न होणे व नगरपरिषद अधिकारी /कर्मचारी वयाच्या ५०/५५ वर्षाच्या पलीकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर लोकहितास्तव सेवा पुनर्विलोकन न होणे.

७) नगरपरिषदांचे कामानुसार प्रतवारी न ठरविली जाणे, ज्या नगरपरिषदा प्रतवारीत मागे आहेत अशा नगरपरिषदांना अंतर्मुख होऊन आपल्या प्रशासकीय कामकाजात सुधारण करण्याच्या दृष्टीने स्पर्धात्मक वातावरण नसणे.

८) नगरपरिषदांची आर्थिक स्थिती सुधारणेचा एक महत्वाचा उपाय म्हणजे आस्थापनेवरील खर्चावर मर्यादा न लावली जाणे.

९) शासन/संचालनालयाचे वतीने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे/निर्देशनांचे कटाक्षाने पालन न करणे.

१०) कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करताना तसेच साहित्य खरेदी करताना नियमबाह्य कृतीचा अवलंब होणे तसेच व्यापक जनहिताचा विचार न करता टाळता येण्यासारखी कामे हाती घेतली जाणे व नगरपरिषद निधीचा गैरवापर होणे.

त्यामुळे नगरपरिषदेच्या कामकाजात आर्थिक नियोजन व उत्पन्न वाढीसाठी भरीव अशी सुधारणा घडवून आणणे जरूरीचे आहे, त्यामुळे खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# -: आदेश :-

## अ) नगरपरिषदांची वित्तीय स्थिती सुधारण्याकरीता उपाययोजना

१) नगरपरिषदेचे अंदाजपत्रक तयार करताना वस्तुस्थितीचे भान ठेवून जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ व अचूकतेने तयार करण्याची दक्षता घेणे जरुरीचे आहे. कोणत्याही परिस्थितीत अपेक्षित जमा व त्या आधारावर खर्च हा भरमसाठ फुगवून दाखवू नये आणि खर्चाचे अंदाजपत्रक तयार करताना कोणत्याही दबावाला बळी न पडता काटकसरीने तयार करावे.

२) भांडवली खर्च करण्याकरीता जर शासकीय अनुदान उपलब्ध नसेल तर महसूली उत्पन्नातुन उचल करु नये. तसेच भांडवली अंदाजपत्रक (नाल्याचे बांधकामे/इतर कामे) वजा शिल्लक दाखवून त्यांचे अंदाजपत्रक तयार करु नये.

३) आस्थापना खर्च करताना कर्मचारी वर्ग इतर विभागाच्या कर्मचा-यांचा विनियोग विषयक कामाकरीता, उदा. पाणीपट्टी वसुली, मालमत्ता कराची वसुली व इतर वित्तीय वसुली करण्यासाठी करण्यात यावा.

४) कोणतीही योजना राबविताना लोकांना त्या योजनेचा फायदा होतो किंवा नाही याचा सातत्याने आढावा घेण्यात यावा.

५) नगरपरिषदेची जी स्वतःची मालमत्ता आहे, उदा. इमारती, मशिनरी, वाहन, अग्निशमन गाडी, दुकाने, जमिन यांचे मोजमाप व मुल्यांकन करुन घसारा वजा करुन योग्य पध्दतीने नोंद मालमत्ता नोंदवहीत घ्यावी.

६) सध्या नगरपरिषदेचे वित्तीय व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्याकरीता व लेखे तपासणीकरीता महाराष्ट्र नगरपरिषद लेखापाल आणि लेखापरिक्षक सेवा संवर्ग हे पद अस्तित्वात आहे. परंतु या यंत्रणेने काढलेल्या लेखा आक्षेपांची दखल फारशा गांभीर्याने घेतली जात नाही. त्यामुळे नगरपरिषदेकडे बरेच लेखा परिच्छेद प्रलंबीत असतात. परंतु याबाबत कोणत्याही प्रकारची गांभीर्याने दखल घेतली जात नाही. तसेच लेखा परिक्षक पथकात महत्त्वाचे अभिलेख नोंदवह्या व इतर दस्तऐवज तपासणीकरीता सादर केले जात नाही. अशा प्रकरणी संबंधित खाते प्रमुखास जबाबदार धरून कारवाई करावी.

७) सध्या नगरपरिषदेचे जे भांडार आहे, त्याची तपासणी कोणत्याही यंत्रणेमार्फत होत नाही. तरी ती तपासणी महाराष्ट्र नगरपरिषद लेखापाल आणि लेखापरिक्षक सेवा संवर्ग यांचेमार्फत करण्यात यावी.

८) स्थानिक लेखा परिक्षण अनुदानातील आक्षेपांवर कार्यवाही करणे.

९) नगरपरिषद अधिकारी/कर्मचारी यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलिकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांची नगरपरिषदेतील सेवा पुढे चालू ठेवण्यासाठी पात्रता आजमाविण्यासाठी त्यांचे गोपनीय अहवाल/सचोटी व शारिरीक क्षमता या विहित केलेल्या निकषाच्या आधारे त्यांच्या प्रकरणाचे पुनर्विलोकन करुन सुयोग व कार्यक्षम अधिकारी/ कर्मचारी यांनाच लोकहितास्तव सेवेत चालू ठेवावे व अकार्यक्षम तसेच संशयास्पद सचोटी असणारे अधिकारी/कर्मचारी यांना मुदतपूर्व सेवानिवृत्त करावे.

(महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ चे नियम १० नुसार)

**ब) नगरपरिषदांसाठी उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना**

१) मालमत्ता करामध्ये विहित मुदतीत मालमत्तेचे पुर्नविलोकन करणे. महाराष्ट्र नगरपरिषदा/नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२४ (२) नुसार करपात्र मूल्यामध्ये सुधारणा ५ वर्षाचा आत कराव्यात. वरील तरतूद कायद्यात नगरपरिषद क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे नमूद असल्याने सदर कामासाठी सर्वसाधारण सभेच्या ठरावाची आवश्यकता नाही.

२) शहरातील प्रत्येक इमारतीस मालमत्ता कर लावला आहे याची खात्री करणे.

३) दरवर्षी नवीन इमारतींसाठी पुरवणी यादी तयार करून मालमत्ता कर लावणे.

४) घरपट्टीचा दर (Rate of tax) वाढविणे/ थकबाकीवर व्याज आकारणे.

५) बखळ/ मोकळ्या जागांनाही कर आकारणी करणे.

६) अग्निशमन कर आकारणी करणे.

७) विशेष स्वच्छता कर (संडास पट्टी) आकारणी करणे.

८) जेथे भुयारी गटार योजना असेल तेथे भुयारी गटार योजना कर आकारणे.

९) सार्वजनिक नळ न देता वैयक्तिक कनेक्शन देणे.

१०) पाणी योजना स्वयंपूर्ण होईल याप्रमाणे पाणीपट्टीचे दर वाढविणे.

११) अनाधिकृत नळ नियमित करणे किंवा खंडीत करणे.

१२) विद्युत देयकात पॉवर फॅक्टरचा दंड बसू नये म्हणून कॅपॅसिटर बसविणे.

१३) सर्व दुकाने व मोकळ्या जागांना त्रिसदस्यीय समितीद्वारे भाडे निश्चित करणे.

१४) सर्व दुकाने व मोकळ्या जागा भाडेनियमानुसार मूल्य निश्चित करून लिलावाद्वारेच देणे.

१५) शासनास भरावयाचा एन.ए. टॅक्स ज्यांना जागा दिली आहे, त्यांचेकडुन वसुल करणे.

१६) सर्व दुकाने व मोकळ्या जागांचे करार/ मुदत संपल्यावर फेर लिलाव करणे. किंवा लीज कराराबाबत दिलेल्या शासन निर्णय नुसार कार्यवाही करणे.

१७) याशिवाय नगरपरिषदांच्या मोकळया जागा वापरणा-या विक्रेत्यांकडुन जागा वापर फी घेणे.

१८) भाजी मंडई/ मटण मार्केट अशा ठिकाणी जागा वापर फी निश्चित करून नियमित वसूल करणे.

१९) हात गाडीला लायसन्स (License) पध्दती लागू करुन वार्षिक फी आकारणे.

२०) रुग्णालयांची नोंदणी करुन वार्षिक नुतनीकरण फी आकारणे.

२१) सर्व जाहिरात बोर्डावर भाडे अधिक जाहिरात कर घेणे. शासनाच्या महाराष्ट्र महानगरपालिका आकाशचीन्हे (Sky Sign) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे (नियमन व नियंत्रण) नियम २०२२ प्रमाणे परवाना शुल्क आकारणीबाबत व नुतनीकरणबाबत योग्य फेरबदलासह कार्यवाही करणे.

२२) अग्निशमन चार्जेस / टँकर फी / शौचालय स्वच्छता फी / ग्रंथालय दर /दवाखाना दर / घरपट्टी दाखला /नक्कल फी / वीज ना हरकत दाखला / बिल्डींग परमिशन / तपासणी फी व त्यासोबत रस्ता वापर चार्जेस घेणे इ. कोणतेही ना हरकत दाखले, प्रमाणपत्र फी यातील वाढ चलनवाढ दरानुसार निश्चित करावी.

२३) डेव्हलपमेंट चार्जेस/ बेटरमेंट चार्जेसमध्ये वाढ करणे (कमाल मर्यादेपर्यंत).

२४) शिक्षण कर / रोजगार कर / रोजगार हमी कराचा रिबीट मिळविणे व त्याचा योग्य ताळमेळ ठेवणे.

२५) मंडप फी / रस्ता वापर फी आकारणे.

२६) स्वागत कमानींना चार्ज आकारणे.

२७) पार्किंग जागा पे अँड पार्क पध्दतीने विकसीत करणे.

२८) सार्वजनिक शौचालये पे अँड युज पध्दतीने विकसीत करणे.

२९) रस्त्यावर उभ्या रहाणा-या वाहनांना फी आकारणे.

३०) सार्वजनिक सुविधांसाठी (बगीचा वगैरे) फी आकारणे.

३१) सर्व थियटर, पेट्रोलपंप, गॅस एजन्सी, मंगलकार्यालय, सभागृहे, फटाक्यांची दुकाने इत्यादींची वार्षिक अग्निशमन तपासणी करून फी आकारणे.

३२) रस्ता खोदाई चार्जेस (MJP, MahaVitaran, Telephone Company) वसुल करणे.

३३) बांधकाम साहित्य ठेवण्यास वापरलेल्या नगरपरिषदांच्या जागेकरीता फी आकारणे.

३४) बांधकाम करताना नगरपरिषदेच्या मत्तेचे नुकसान झाल्यास ते वसुल करणे.

३५) नगरविकास विभाग घनकचरा व्यवस्थापन करिता उपभोक्ता शुल्क लागू करणे व त्याची

वसुली करणे.

३६) मालमत्तेचा फेरफार करतांना/हस्तांतरण करताना खरेदी-विक्री होणाऱ्या मालमत्तावर खरेदी/विक्री रकमेच्या विशिष्ट प्रमाणात (उदा.१%) फेरफार शुल्क घेण्यात यावे.

३७) अनधिकृत बांधकाम यांना शासन निर्णय नुसार महा. गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे/श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ नुसार प्रक्रिया राबवून प्रशमन शुल्क व विकास शुल्क वसूल करणे.

३८) नगरपालिका क्षेत्रातील अधिकृत झोपडपट्ट्या (Notified Slum) क्षेत्रात महसूल विभागाच्या मदतीने पट्टेवाटप करणे व तद्नंतर विकासशुल्क वसुलीची कार्यवाही करणे.

३९) अनधिकृत बांधकामावर शासन निर्णय व कायद्यानुसार निश्चित केलेली शास्ती आकारणे. (करच्या दुप्पट दंड) व ती वसूल करणे

४०) निश्चित केलेल्या जागांवर होर्डिंग बनर लावणेकरिता परवानगी शुल्क आकारणे.

४१) रस्ता दुभाजकात असणाऱ्या विद्युत खांबावरील जाहिरातीकारिता शुल्क आकारणे.

४२) नगरपरिषदचे मालकीचे शहरातील विविध सभा मंडप व सभागृह चालवण्याकरिता लिलावाने देखभाल दुरुस्तींसह शुल्क देणे.

४३) जागा वापर फी, बाजार चिठ्ठी वसुली, कोडवाडा शुल्क वसुली, जाहिरात परवाना शुल्क वसुलीकरिता लिलावाद्वारे/निविदेद्वारे देकार मागवून एजन्सी नियुक्त करणे.

४४) दुकानगाळे, जुने कॉम्प्लेक्स यांची पुनर्विकास योजना राबवून उत्पन्न वाढवावे.

**क) नगरपरिषदांसाठी काटकसरीच्या उपाययोजना**

१) बजेट तरतुदीशिवाय खर्च न करणे.

२) नगरपरिषदेकरीता करावयाची खरेदी योग्य व वाजवी दरानेच करावी, कामात व खरेदीत गुणवत्तेवर पूर्ण लक्ष द्यावे.

३) सार्वजनिक समारंभ /सत्कार समारंभ टाळावेत.

४) शुभेच्छा जाहिरात देवू नयेत.

५) रोजंदारी, अस्थायी व मानधन कर्मचारी कमी करणे (औद्योगिक कलह कायद्यातील विहित तरतुदींचे पालन करुन). व सदर सेवा घेतांना किमान वेतनाच्या आधारे जास्त खर्च होऊ नये, याकरिता बचतगटांच्या माध्यमातून सेवा घेणे/किंवा कंत्राटदार कडून अर्धा दिवस तत्वावर सेवा घेणे.

६) स्वयंसेवी संस्था / उद्योजक यांचे मदतीने/ सहभागाने चौक-पुतळे सुशोभिकरण, रेलींग, डिव्हायडर, ओपन स्पेस डेव्हलपमेंट, वृक्षारोपण, ट्री गार्ड इत्यादी कामे करणे.

७) नगरपरिषदेच्या सर्व मालमत्तांची जागांची रजिस्टरला नोंद घ्यावी, त्यावर अतिक्रमण होवू देवू नये व या मालमत्तांचा सुयोग्य वापर करावा.

८) वाहनांचा वापर दुरुस्ती, कोर्ट केसेस, स्टॉक-डेड स्टॉक रेजिस्टर यावर नियंत्रण ठेवून काटकसर करणे.

९) विद्युत दिवे रात्री १० ते ५ दरम्यान पर्यायाने (Alternate) चालविणे. रस्त्यावरील सार्वजनिक उपयोगांचे जागी विद्युत पुरवठा योग्य वेळी सुरु होणे, बंद होणे यासाठी Sensor Timer यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, सोलर यंत्रणा व एल.ई.डी. दिव्यांचा वापर करणे.

१०) नगरपरिषदेच्या विविध खात्यांना लागणारी जंतुनाशके / स्टेशनरी / औषधे / इतर साहित्य याचा प्रत्यक्षातील साठा, विचारात घेवुनच गरजेनुसार खरेदी करावी. एकाच वेळी संपूर्ण वर्षाचा साठा करणे टाळावे.

११) दुरध्वनी खर्चावर नियंत्रण ठेवणे.

१२) अधिकारी / पदाधिकारी यांचे वाहनावरील खर्च कमी करणे.

१३) नगरपरिषदेच्या सर्व सेवा सशुल्क करणे.

१४) नगरपरिषदच्या पाणीपुवठा योजना, मलनि:स्सारण प्रक्रिया केंद्रे, हायमास्ट, नगरपरिषदच्या मालकीच्या सर्व इमारतीवर सोलर संयत्र लावणे व Net-Metering द्वारा विद्युत देयकावर होणारा खर्च कमी करणे.

१५) अनावश्यक हायमास्ट, हातपंप बोरवेल न लावणे.

१६) विद्युत व टेलिफोन देयके विहित मुदतीत भरणे, जेणेकरून दंडाच्या रक्कमेचा भुर्दंड पडणार नाही.

१७) विद्युत देयक नगरपरिषदला दर आकारणी करताना वाणिज्य दराने आकारणी होणे ऐवजी सार्वजनिक दराने आकारणी होते किंवा नाही याची पडताळणी करावी.

१८) ई वाहनांचा वापर वाढविणे.

१९) दस्ताऐवजांचे संगणकीकरण करून ठेवणे. Paper Less office संकल्पना राबवणे.

उत्पन वाढीसाठी व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक घडी सुयोग्य ठेवण्यासाठी केवळ मार्गदर्शक स्वरुपात वरील पर्याय सुचविण्यात आलेले आहेत. स्थानिक परिस्थिती नुसार यातील काही पर्याय त्या शहरात लागू होणार नाहीत मात्र स्थळपरत्वे अन्य पर्याय हि उपलब्ध होऊ शकतात त्यामुळे या बाबत प्रत्येक नगर परिषदेने स्थानिक पातळीवर सूक्ष्म नियोजन करून उत्पन वाढीसाठी व आर्थिक शिस्ती साठी उपाय योजना करावी.

आपण करीत असलेल्या उपायोजना बद्दलचा अहवाल आपण संबंधित विभागीय सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन यांच्याकडे सादर करावा आणि या संचालनालयास पाठवावा.

Manoj Vijay Ranade
Digitally signed by Manoj Vijay Ranade
Date: 2024.02.01 13:44:32 +05'30'

**(मनोज रानडे भा.प्र.से.)**

**आयुक्त तथा संचालक**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई**

**प्रति,**

१) विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)

२) जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व ).

३) अध्यक्ष /प्रशासक, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).

४) मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१) मा. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) विभागीय आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व ).

३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.

४) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा,सर्व विभाग.

५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई (सर्व कार्यासन).

६) निवड नस्ती.